सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**अधीक्षक,**
**येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे-०६**

सुधारणा व पुनर्वसन
दुरध्वनी क्र. ०२० २६६८२६६३
ई-मेल-yerwadacp-mh@gov.in

**दि.२०.०९.२०२४.**

## प्रेस नोट

के रहेजा ग्रुप तर्फे सामाजिक बांधिलकी जपत येरवडा मध्यवर्ती कारागृहातील बंद्यांसाठी तसेच अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छता गृह, अत्याधुनिक रुग्णवाहीका व इतर मुलभुत सोई-सुविधांसाठी ७०.८१ लाख रुपयांचा सी एस आर फंड कारागृह विभागास देण्यात आला. त्यानूसार काम सुरु करण्यासाठी पहिला २० लाख रुपयांच्या हफ्त्याचा धनादेश कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत गोसावी यांचे हस्ते मा. श्रीमती. स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांना दि.२०.०९.२०२४ रोजी हस्तांतरीत करण्यात आला.

कारागृहातील बंदी व अधिकारी / कर्मचारी यांना मुलभुत सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याची अभिनव संकल्पना राबविणेसाठी श्री. सुनिल ढमाळ, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, श्रीमती. पी पी कदम, अति. अधीक्षक, श्री. सी आर सांगळे, तुरुंगाधिकारी श्रेणी-०२ व रेहजा ग्रुपचे सहयोगी उपाध्यक्ष नरेंद्र वडनेरे यांनी कामकाज पाहीले.

सदर उपक्रम मा. प्रशांत बुरडे (भा.पो.से) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. डॉ. जालिंदर सुपेकर (भा.पो.से) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे संल्पनेतून व मा. श्रीमती. स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

सदर कार्यक्रमास मा. श्रीमती. स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे, श्री. नितिन वायचळ, प्राचार्य, दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, पुणे, श्री. सुनिल एन ढमाळ, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, श्री. अनिल खामकर, अधीक्षक, येरवडा जिल्हा खुले कारागृह, श्रीमती. पी पी कदम, अति. अधीक्षक, श्री. विजय कांबळे, उपअधीक्षक, काउमनि कार्यालय तसेच अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner